मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# कोट्यवधीचा खर्च करूनही प्राणिसंग्रहालय भकास

## बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयास गेल्या सात वर्षांपासून टाळे

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

संभाजीनगर, चिंचवड येथील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयास गेल्या सात वर्षांपासून टाळे आहे. संग्रहालयाच्या नूतनीकरणावर तब्बल २० कोटींचा खर्च करूनही तेथील चित्र भकास आहे. कामाचा दर्जा सुमार असल्याने अनेक ठिकाणी गळती लागली आहे. तर, कासव विभागात पावसाचे पाणी साचले आहे. अनेक महिने बंद स्थितीतील या कामाच्या दुरुस्तीसाठी पुन्हा कोट्यवधींचा भार महापालिकेस सहन करावा लागणार आहे. सात एकर क्षेत्रातील या प्राणिसंग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम बी. के. खोसे या ठेकेदारामार्फत २० मे २०१६ ला सुरू झाले.पहिल्या टप्प्यात तब्बल १३ कोटी ७४ लाखांचे काम ९ मार्च



२०१९ ला पूर्ण झाले. या कामाची मुदत २४ महिने असताना ३६ महिने लागले. दुसर्या टप्प्यातील कामही याच ठेकेदाराला देण्यात आले. ते काम ५ सप्टेंबर २०१९ ला सुरू होऊन २९ डिसेंबर २०२१ ला संपल्याचा दावा महापालिकेने केला आहे. त्यासाठी ६ कोटी २४ लाखांचा खर्च झाला. आतापर्यंत नूतनीकरणावर तब्बल २० कोटींचा खर्च करूनही ते संग्रहालय दोन वर्षांपासून बंदच आहे. संग्रहालय परिसरात सर्वत्र झाडीझुडपे उगवली आहेत. देखभालीअभावी अनेक झाडे करपली आहेत. काही झाडे तोडून टाकली आहेत. सर्वत्र कचरा साचला आहे. कामाचा दर्जा सुमार असल्याने अनेक ठिकाणी गळती लागली आहे. कासव व मासे विभागात पावसाचे पाणी साचले आहे. सर्प विभागात सूर्यप्रकाश व्यवस्थेसाठी लावण्यात आलेल्या काचा अस्वच्छ झाल्या आहेत. तसेच, पक्षालयाच्या सुरक्षा जाळ्या गंजत आहेत. परिसरात भटक्या कुत्र्यांचा मुक्त संचार आहे. आवारात दारूच्या बाटल्याचा खच पडला आहे. प्रवेशद्वाराची सजावट काही ठिकाणी तुटली आहे. तेथील जुने बांधकाम धोकादायक स्थितीत असून, ते कधीही ढासळू शकते. त्यातच ५२ सर्प, ८३ पक्षी, २ मगर व ४७ कासव ठेवण्यात आले आहेत. कमी जागा असल्याने त्या प्राण्यांचा अक्षरशः कोंडमारा होत आहे. याच कारणांमुळे येथील विविध ३६ पक्षी, प्राणी व सर्पांचा मृत्यू झाल्याचा आरोप हिवाळी अधिवेशनात करण्यात आला. ते मृत्यू नैसर्गिक असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्राणिसंग्रहालय राज्य शासनाच्या वन विकास महामंडळाकडे दिले आहे. त्यामुळे हे प्राणिसंग्रहालय महापालिकेऐवजी महामंडळ चालविणार आहे. त्यासंदर्भात नुकतीच एक बैठक झाली आहे. नूतनीकरणाचे सर्व काम पूर्ण करून महापालिका महामंडळाच्या ताब्यात हे संग्रहालय देणार आहे. प्राणिसंग्रहालयाच्या आवारात प्रचंड प्रमाणात झाडीझुडपे उगवली आहेत. तेथून पायी चालणेही अवघड झाले आहे. संग्रहालयाच्या परिसरात मोकळी जागा तसेच, हिरवळ आहे. त्यामुळे या भागात सर्प आढळून येत आहे. पर्यायाने कर्मचार्यांना सर्पदंशाचा धोका आहे.

### राज्य सरकारकडून संचालन

» मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे प्राणिसंग्रहालय राज्य शासनाच्या वन विकास महामंडळाकडे दिले आहे. त्यामुळे हे प्राणिसंग्रहालय महापालिकेऐवजी महामंडळ चालविणार आहे. त्यासंदर्भात नुकतीच एक बैठक झाली आहे. नूतनीकरणाचे सर्व काम पूर्ण करून महापालिका महामंडळाच्या ताब्यात हे संग्रहालय देणार आहे.

“ प्राणिसंग्रहालयात तिसर्या व अखेरच्या टप्प्यातील काम करणे बाकी आहे. त्यासाठी १५ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. पूर्वीची निविदा रद्द केली आहे. नवीन निविदाप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यासाठी १५ महिन्यांचा कालावधी लागेल.

–मनोज सेठिया,
सहशहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

# करोना काळात पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये भ्रष्टाचार

## रुग्णांवर उपचार न करताच घेतले करोडो रुपये

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

करोना काळात उभारलेल्या काळजी केंद्रात एकाही रुग्णावर उपचार न करता सव्वा तीन कोटी रुपयांचे बिल महापालिकेकडून घेणाऱ्या फॉर्च्युन स्पर्श हेल्थ केअर प्रा. लि. कंपनी प्रशासनाला आयुक्त शेखर सिंह यांनी दणका दिला आहे. ही रक्कम 'स्पर्श'कडून वसूल करण्याचे आदेश दिले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपची सत्ता असताना करोना काळजी केंद्राच्या नावाखाली सव्वा तीन कोटींच्या झालेल्या भ्रष्टाचारावर एक प्रकारे शिक्कामोर्तबच झाले असून न्यायालयाच्या आदेशानुसार ही कारवाई झाली आहे. महापालिकेने करोना महामारीत भोसरीतील रामस्मृती मंगल कार्यालय, हिरा लॉन्स येथे करोना काळजी केंद्र उभारण्यासाठी फॉर्च्युन स्पर्श हेल्थ केअर प्रा. लि. कंपनीची नेमणूक केली. मात्र, याठिकाणी कोणतीही वैद्यकीय सुविधा न उभारता, एकाही रुग्णावर उपचार न करता 'स्पर्श'ला तीन कोटी २९ लाख रूपये रक्कम अदा केली होते. याविरोधात सामाजिक कार्यकर्ते सुनिल कांबळे यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेत जनहित याचिका दाखल केली. न्यायालयाच्या आदेशानुसार महापालिकेने कागदपत्रांची पडताळणी केली. 'स्पर्श'ला ९० दिवसांकरिता कामकाजाचे आदेश दिले होते. केंद्रात एकही रुग्ण दाखल नाही झाला तरी पैसे देणार या निविदेतील अटी-शर्तीनुसार १ ऑगस्ट ते ३० ऑक्टोबर २०२० चे तीन कोटी अदा केले. परंतु, रामस्मृती मंगल कार्यालय, हिरा लॉन्स येथे केंद्र सुरू करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी उपलब्ध नसल्याने केंद्र सुरूच केले नव्हते. एकाही रुग्णाला तिथे उपचारासाठी पाठविले नसल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कळविले.आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्याला डावलून थेट अतिरिक्त आयुक्तांच्या स्वाक्षरीने या केंद्राचा करारनामा करण्यात आला होता. तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी 'स्पर्श'ने चुकीची, महापालिकेला फसवणूक करण्याच्या हेतूने बिले सादर केल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतरही तत्कालीन अतिरिक्त आयुक्तांनी आयुक्तांची लेखी मान्यता न घेता बिल अदा केले. याबाबत तक्रारी आल्याने तत्कालीन आयुक्तांनी 'स्पर्श'ची ऑटो क्लस्टरमधील कामाची बिले रोखून चौकशी समिती गठीत केली होती.

# पुलावर खर्च झाले १०० कोटी, तरीही काम अपूर्ण

## बोपखेलवासीयांचा नऊ वर्षांपासून १५ किलोमीटरचा वळसा अद्यापही सुरूच



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
बोपखेल व खडकीला जोडणाऱ्या मुळा नदीवरील शंभर कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येत असलेल्या पुलाचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. मात्र, उच्चदाब विद्युत वाहक तारांच्या एका मनोऱ्याच्या (टॉवर) अडथळ्यामुळे उर्वरित काम पूर्ण करण्यात अडचणी येत आहेत. मनोऱ्याच्या स्थलांतरासाठी बोपखेल येथील खासगी जागा ताब्यात येत नसल्याने पुलाचे काम रखडले आहे. परिणामी, बोपखेलवासीयांचा मागील नऊ वर्षांपासून सुरू असलेला १५ किलोमीटरचा वळसा अद्यापही सुरूच आहे. कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरींगने (सीएमई) १३ मे २०१५ रोजी बोपखेल ते दापोडी हा नागरी रस्ता बंद केला. नागरिकांना नाईलाजास्तव दिघी, विश्रांतवाडीमार्गे पिंपरी-चिंचवड शहरात ये-जा करावी लागत आहे. रहिवाशांची मोठी गैरसोय होत आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर महापालिका नागरिकांसाठी बोपखेल ते खडकी असा मुळा नदीवर एक हजार ८६६ मीटर म्हणजे सुमारे दोन किलोमीटर अंतराचा पूल बांधण्यात येत आहे. पुलाचे काम टी अँड टी इन्फ्रा कंपनी करीत आहे. न्यायालयीन प्रक्रिया, संरक्षण विभागाकडून जागा ताब्यात येण्यास विलंब या कारणांमुळे पुलाचे काम रखडले होते. बोपखेलच्या बाजूने काम पूर्ण झाल्यानंतर संरक्षण विभागाच्या खडकीकडील कामास दोन ऑक्टोबर २०२१ ला परवानगी मिळाल्यानंतर काम सुरू करण्यात आले.हा पूल ५१२ आर्मी बेस वर्कशॉप, ॲम्युनिशन फॅक्टरी तसेच संरक्षण विभागाच्या इतर आस्थापनांच्या जवळून जात असल्याने सुरक्षेसाठी पुलाच्या दोन्ही बाजूस पाच मीटर उंचीची सीमा भिंत उभारली आहे. त्यावर १.५ मीटर उंचीचे सुरक्षा कठडे बसविण्यात येत आहेत. पुलाचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे. जागा ताब्यात घेणे, पुलाचे काम, मनोरे हटविणे, इतर कामांसाठी शंभर कोटींचा खर्च झाला आहे. नदी पात्र, लष्कराचा रेल्वे मार्ग, वन क्षेत्र, रस्ता व विविध संरक्षण विभागाच्या भूखंडावरून पूल जातो. रस्त्यांची रुंदी आठ मीटर असून दोन लेनचा मार्ग आहे. पुलावर पादचाऱ्यांसाठी पदपथ नाही. केवळ दुचाकी, तीन व चारचाकींसाठी वाहनांना पुलाचा वापर करता येणार आहे. पीएमपीएल बसची वाहतूकही येथून होणार नाही.उच्चदाब वाहक विद्युत तारांच्या मनोऱ्याचे स्थलांतर केल्यानंतरच काम करता येणार आहे. त्यासाठी बोपखेलच्या बाजूने एक मनोरा उभारणे आवश्यक आहे. खडकीकडील जागा ताब्यात आली असून, तेथे पाच मनोरे उभारून तारांची जोडणी करण्यात आली आहे. मात्र, बोपखेल येथील खासगी जागा ताब्यात येत नसल्याने ते काम रखडले आहे. मनोरा स्थलांतर केल्याशिवाय पुलाचे काम करू नये, अशी सूचना महापारेषण कंपनीने महापालिकेला केली आहे. जागा ताब्यात घेण्याची कारवाई तत्काळ करण्याबाबत विद्युत विभागाकडून नगररचना विभागासोबत पत्रव्यवहार केला. मात्र, त्याला यश मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे पुलाचे अंतिम टप्प्यातील काम रखडले आहे. कामाची मुदत एप्रिल २०२३ संपून दहा महिने झाले तरी काम अर्धवट स्थितीत आहे. स्थापत्य प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता बापूसाहेब गायकवाड म्हणाले की, मनोऱ्याचे स्थलांतर करण्यासाठी जागा ताब्यात घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. स्थलांतरण झाल्यानंतर तातडीने पूल तयार करून वाहतुकीसाठी खुला केला जाईल.

# रुग्णवाहिकेतून गांजा विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई



**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपरी- चिंचवडच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने गांजाची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. वेगवेगळ्या केलेल्या कारवाईत एकूण एक कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा पोलिसांनी जप्त केला आहे. गंभीर बाब म्हणजे आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजा विक्री करत असल्याचं पोलीस तपासात समोर आलं आहे. कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे, हनुमंत भाऊसाहेब कदम, देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे, सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा, सन्नीदेवल भगवानदास भारती आणि सौरभ निर्मल यांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी रावेत पोलीस ठाण्याच्या हद्दीतून कृष्णा मारुती शिंदे, अक्षय बारकू मोरे आणि हनुमंत भाऊसाहेब कदम यांना ताब्यात घेतलं. त्यांच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर ३० लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यात २५ लाख ३९ हजार किमतीचा २५ किलो गांजा, चारचाकी आणि चार मोबाईलचा समावेश आहे. आरोपींनी गांजा देवी प्रसाद उर्फ देवा सीताराम डुकळे यांच्याकडून आणला होता. तो सौरभ निर्मल यास विकणार असल्याचं तपासात समोर आलं आहे. त्यांच्या विरोधात रावेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दरम्यान, आरोपी देवी प्रसादलाही अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून ५० लाख २० हजारांचा ५० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. आरोपी हे रुग्णवाहिकेतून गांजाची विक्री आणि डिलिव्हरी करत असल्याच तपासात समोर आले आहे. तसेच सन्नीदेवल सिध्दार्थ शर्मा आणि सन्नीदेवल भगवानदास भारती यांच्याकडून २० लाख ७९ हजारांचा २० किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. असा एकूण १ कोटी ३१ लाखांचा ९६ किलो गांजा जप्त करण्यात आला आहे. हा गांजा रूपीनगर चिखलीत विकणार असल्याचं समोर आलं आहे.

# मी पण आधी पत्र्याच्या घरात राहायचो

## मोदी भावूक होताच अजित पवारांना पडता काळ आठवला

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** सोलापुरा तील कार्यक्रमावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी भावुक झाले होते. त्यानंतर विरोधकांनी यावर टीकास्त्र सोडलं होतं. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पुण्यात प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी आता माणूस आहे, भावुक होणार. जुने दिवस त्यांना आठवले त्यामुळं ते भावुक झाले, असे उत्तर दिले. त्याशिवाय त्यांना पडता काळही आठवला. मी पण आधी पत्र्याच्या, सारवलेल्या घरात राहायचो, आता बंगल्यात राहतो, असे अजित पवार म्हणाले. ते पुण्यात बोलत होते. आता तुम्ही जर पत्र्याच्या घरात, छोट्याश्या घरात राहिला असाल. त्यांना त्यांची त्यावेळची अवस्था आठवली असेल आणि पंतप्रधान झाल्यावर आपण अनेकांना घरं देतोय. हे पाहून भावुक झाले असतील. मी पण





आधी पत्र्याच्या घरात, सारवलेल्या घरात राहायचो, नंतर बंगला झाला. काळानुरूप परिस्थिती बदलत असते. आता मोदी पंतप्रधान आहेत, मात्र पूर्वीचे दिवस कोणीच विसरत नाही. ते आज त्यांना आठवलं असेल, म्हणून ते भावुक झाले असावेत, असे अजित पवार म्हणाले. गर्दी झाली म्हणून टीका करतेत व्हय. एवढी प्रचंड गर्दी, काय सांगू तुला. आता माणूस आहे, भावुक होणार. जुने दिवस त्यांना आठवले त्यामुळं ते भावुक झाले. घरं चांगली झालीत. कष्टाळू, गरजूंना घरं मिळाली. पंतप्रधान मोदींच्या हस्तेच भूमिपूजन झालं तेंव्हा घरं माझ्या हाताने वितरित होणार, असं त्यांनी बोलून दाखवलं होतं. तो शब्द खरा ठरला. विरोधकांच्या पोटात का दुखतंय, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. महाराष्ट्रात सहकार क्षेत्रामुळे विविध बदल झाले आहेत. सहकार चळवळ मजबूत करण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या संचालक मंडळांनी विश्वासहर्ता जपली पाहिजे. बँकेचे कामकाज करतांना ठेवीदारांच्या विश्वासाला तडा जाता कामा नये, ही काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. कर्जदारांनीदेखील वेळेत कर्ज परत करावे. यामुळे या क्षेत्रात आर्थिक शिस्त लागण्यास मदत होईल. सहकार क्षेत्राला आणखीन मजबूत करण्यासाठी एकत्रित काम करण्याचे आवाहन करून या क्षेत्रातील अडी अडचणी सोडण्यासाठी शासन सहकार्य करेल, असे अजित पवार म्हणाले. पुणे मर्चंटस को-ऑप बँकेला शतक महोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल शुभेच्छा देतांना ते म्हणाले, या बँकेच्या वाटचालीमध्ये बँकेच्या आजी-माजी अध्यक्ष, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. शतक महोत्सवी वर्षातील वाटचाल सहकार क्षेत्रातील महत्वाचा टप्पा असून बँकेने आणखीन खूप मोठा टप्पा गाठायचा आहे. बँकेचे कार्यक्षेत्र राज्यस्तरीय करण्याबरोबरच छोट्या व्यवसायिकांना, तरुणांना तसेच पत नसलेल्याही कर्ज देण्याबाबत संचालक मंडळांनी विचार करावा. शतक महोत्सवी वर्षात विविध लोकाभिमुख काम करावे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले. सर्वांना विश्वासात घेऊन शहरात विविध विकासकामे करण्यात येत असून ही कामे जलद गतीने मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

या कामांमुळे शहरात प्रदूषण वाढत असून काम करतांना संबंधितांनी याबाबत खबरदारी घ्यावी. नागरिकांनी याबाबत सूचना असल्यास प्रशासनाला कळवाव्यात, असे आवाहन पवार यांनी केले. आता तुम्ही जर पत्र्याच्या घरात, छोट्याश्या घरात राहिला असाल. त्यांना त्यांची त्यावेळची अवस्था आठवली असेल आणि पंतप्रधान झाल्यावर आपण अनेकांना घरं देतोय. हे पाहून भावुक झाले असतील. मी पण आधी पत्र्याच्या घरात, सारवलेल्या घरात राहायचो, नंतर बंगला झाला. काळानुरूप परिस्थिती बदलत असते. आता मोदी पंतप्रधान आहेत, मात्र पूर्वीचे दिवस कोणीच विसरत नाही. ते आज त्यांना आठवलं असेल, म्हणून ते भावुक झाले असावेत, असे अजित पवार म्हणाले. गर्दी झाली म्हणून टीका करतेत व्हय. एवढी प्रचंड गर्दी, काय सांगू तुला. आता माणूस आहे, भावुक होणार. जुने दिवस त्यांना आठवले त्यामुळं ते भावुक झाले. घरं चांगली झालीत. कष्टाळू, गरजूंना घरं मिळाली. पंतप्रधान मोदींच्या हस्तेच भूमिपूजन झालं तेंव्हा घरं माझ्या हाताने वितरित होणार, असं त्यांनी बोलून दाखवलं होतं. तो शब्द खरा ठरला.

# नृत्य कलाकारांना हक्काचे व्यासपीठ हवे!

## मेहबूब शेख : युवक राष्ट्रवादीतर्फे जिल्हास्तरीय डान्स स्पर्धा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** ''पिंपरी चिंचवड युवक काँग्रेसने डान्स स्पर्धा आयोजित करून शहरातील अनेक नृत्य कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले याचा मला अभिमान वाटतो. नृत्य कलाकारांच्या अथक परिश्रम बघता राज्य शासनाने नृत्य कलाकार यांना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज आहे अशी अपेक्षा राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष मेहबुब शेख यांनी व्यक्त केली.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) आयोजित शरद कला व क्रीडा महोत्सव जिल्हास्तरीय डान्स स्पर्धेस शहरातील तीनही विधानसभेतील नागरिकांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण एक लाख रुपयांहून अधिक रोख रक्कम आणि पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धेचे पर्यवेक्षक म्हणून अक्षय ढेरे, प्रेरणा साळवी, भाग्यश्री जाधव यांनी काम पाहिले तर साई काळे व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस टीमने या कार्यक्रमाचे नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने केले. यावेळी माजी विरोधी पक्षनेते मच्छिंद्र तात्या तापकीर,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उपाध्यक्ष प्रकाश मस्के,महिला शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर,प्रदेश संघटक राहुल पवार, युवक कार्याध्यक्ष सागर तापकीर, कामगार नेते काशिनाथ नखाते,भोसरी विधानसभा अध्यक्ष ॲड. संतोष शिंदे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक पदाधिकारी उपस्थित होते. सदर स्पर्धा ग्रुप डान्स व सोलो डान्स या प्रकारात घेण्यात आली. ग्रुप डान्स प्रकारात जी एन डी ग्रुप यांनी प्रथम क्रमांक,टीम डान्सहूड ग्रुप यांनी द्वितीय क्रमांक,तृतीय क्रमांक डी डब्ल्यू एम क्र्यू ग्रुप आणि उत्तेजनार्थ क्रमांक गेम चेंजर ग्रुप यांनी पटकावला. तर सोलो डान्स या प्रकारात नावे प्रथम क्रमांक प्रदीप गुप्ता,द्वितीय क्रमांक साजन तमांग,तर तृतीय क्रमांक इशिता बरवडे,उत्तेजनार्थ क्रमांक -रोहन उंबारे,यांना मिळाले. यावेळी आयोजकांच्या वतीने सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले.राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष मेहबूब भाई शेख, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांच्या हस्ते या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ पार पडले. महाविकास आघाडीचे मावळ लोकसभेचे संभाव्य उमेदवार शिवसेना नेते संजोग वाघेरे यांनी आवर्जून उपस्थिती लावत स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या व राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या टीमचे कौतुक केले. इम्रान शेख म्हणाले की, ''पिंपरी चिंचवड शहरातील नृत्य कलाकारांची संख्या लक्षणीय असून महापालिकेने खेळाडू दत्तक योजनेत नृत्य स्पर्धकांना सहभागी करून द्यावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.'' सुनील गव्हाणे म्हणाले, की ''पवार साहेबांच्या कार्यकर्तृत्वामुळे पिंपरी चिंचवड शहराच्या औद्योगीकरणाची भरभराट झाली. पुढे उद्योगनगरीची आयटीनगरी करण्याचं काम देखील आदरणीय पवार साहेबांनीच केलं. ही नगरी आता स्वत:ची ओळख सांस्कृतिक नगरी म्हणून करू पाहत आहे.

# सुप्रिया सुळेंच्या मतदारसंघातील सीमेवर असलेल्या कामांची अजित पवारांकडून पाहणी

## मी पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री आणि राज्याचा उपमुख्यमंत्री

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोन्ही गटामधील नेत्यांमध्ये मागील सहा महिन्याच्या कालावधीत आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे.या सर्व घडामोडी दरम्यान आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कात्रज चौक ते खडी मशीन चौका दरम्यान येणार्या रस्त्यांच्या कामांची पाहणी केली. तर बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या मतदार संघाच्या बॉर्डरवर असलेल्या कामांची पाहणी अजित पवार यांनी केल्याने सुप्रिया सुळे यांच्या मतदारसंघात अजित पवार यांनी अधिकच लक्ष घालण्यास सुरुवात केल्याची चर्चा सुरू झाली.त्या पाहणी दौर्याबाबत अजित पवार म्हणाले की,मी पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री आणि राज्याचा उपमुख्यमंत्री आहे. कोणाच्या बॉर्डरवर आणि आतमध्ये काही नाही. सगळीकडे लक्ष देण हे माझ काम असल्याच सांगत सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.भाजपचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील एका कार्यक्रमामध्ये रस्त्यांच्या कामाबाबत घोषणा केली होती.त्याबाबत अजित पवार यांना विचारले असता अजित पवार म्हणाले की,आता पुन्हा मागच कशाला काढतो.मागच किती ही काढल तरी काही अडचणी असतात,त्यामुळे आता मागच फार काही काढू नकोस,असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांची बाजू अजित पवार यांनी सावरून घेतल्याचे पाहण्यास मिळाले.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सोलापूर येथील कार्यक्रमा दरम्यान भावूक झाल्याच पाहण्यास मिळाल.त्यावरून विरोधकानी टीका केली आहे.त्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले की, गर्दी झाली म्हणून विरोधकांना त्रास झाला का ? अशा शब्दात विरोधकांना त्यांनी टोला लगावत ते पुढे म्हणाले की, सोलापूर येथील कार्यक्रमाला प्रचंड गर्दी पाहण्यास मिळाली.तसेच ते पण माणुस आहे.ज्या माणसात माणुसकी असते.तो भावूक होतो. तेथील घर पाहिल्यावर त्यांना देखील जुने दिवस आठवले,त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्या कामाच भूमिपूजन केले आणि नागरिकांना घरे देण्यास देखील ते आले.त्यामुळे त्यांनी दिलेला शब्द पाळला आहे.३० हजार घरांपैकी १५ हजार घर देण्यात आली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात घर देण्यात आली आहेत.त्या कामाच विरोधकानी कौतुक केले पाहिजे. अशा शब्दात अजित पवार यांनी विरोधकांना त्यांनी सुनावले.। सर्व घडामोडी दरम्यान आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कात्रज चौक ते खडी मशीन चौका दरम्यान येणार्या रस्त्यांच्या कामांची पाहणी केली.



### सुप्रिया सुळे यांना टोला लगावला

» तर बारामती लोकसभा मतदार संघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या मतदार संघाच्या बॉर्डरवर असलेल्या कामांची पाहणी अजित पवार यांनी केल्याने सुप्रिया सुळे यांच्या मतदारसंघात अजित पवार यांनी अधिकच लक्ष घालण्यास सुरुवात केल्याची चर्चा सुरु झाली.त्या पाहणी दौर्याबाबत अजित पवार म्हणाले की,मी पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री आणि राज्याचा उपमुख्यमंत्री आहे.कोणाच्या बॉर्डरवर आणि आतमध्ये काही नाही.सगळीकडे लक्ष देण हे माझ काम असल्याचा सांगत सुप्रिया सुळे यांना टोला लगावला.

# ऊसतोड मुकादमाकडून फसवणूक झाल्यास तक्रारी द्या

## बारामतीचे अप्पर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे यांनी केले आवाहन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ऊसतोड मजूर व मुकादम यांच्याकडून फसवणूक झालेल्या वाहतूकदारांनी एकत्रित तक्रारी पोलिसांकडे दाखल कराव्यात. पुरावे तपासून रीतसर गुन्हे दाखल करण्याची आणि संबंधित फसवणूक करणार्यांना पोलिसांकडून समन्स पाठविण्यात येईल. वाहतूकदारांनी एकटे वसुलीसाठी जाऊन धोका पत्करू नये, असे आवाहन बारामतीचे अप्पर पोलिस अधीक्षक आनंद भोईटे यांनी केले. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यावर ऊसतोड मजूर, वाहतूकदार, कारखाना प्रतिनिधी यांच्यासोबत भोईटे यांनी साधला. फसवणूक झालेल्या वाहतूकदारांनी आपापल्या तक्रारी भोईटे यांच्यासमोर मांडल्या. कोट्यवधी रुपयांना चुना लागल्याने जगणे



अवघड झाल्याच्या तसेच कर्जबाजारी झाल्याच्या तीव प्रतिक्रिया काही वाहतूकदारांनी दिल्या. भोईटे यांनी याबाबत वाहतूकदारांशी चर्चा केली. जळगाव जिल्ह्याच्या पोलिस अधिकार्यांशीही मोबाईलव्दारे त्यांनी संवाद साधला. या प्रसंगी वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन काळे, फौजदार पांडुरंग कान्हेरे उपस्थित होते. कारखान्याच्या वतीने अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप, कार्यकारी संचालक राजेंद्र यादव, संचालक लक्ष्मण गोफणे, प्रवीण कांबळे, शेती अधिकारी बापूराव गायकवाड, सतीश काकडे, विधी सल्लागार ॲड. अभिजित जगताप, वाहतूक संघटनेचे सदस्य उपस्थित होते. भोईटे म्हणाले की, पुरावे सादर केल्यास फसवणूक करणार्या मजूर व मुकादमांवर फसवणुकीचे आणि धनादेश न वटल्याचे गुन्हे दाखल करणे शक्य आहे. सोमेश्वर कारखाना कार्यक्षेत्रातील जेजुरी, वडगाव निंबाळकर या पोलिस ठाण्यांत तक्रारी एकत्रित दाखल कराव्यात. काही प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तीला बोलावून तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न पोलिसांमार्फत केला जाईल. यासाठी पोलिसांच्या पातळीवर विशेष समितीही स्थापन केली जाईल.